महत्वाचे :
कालमर्यादित :

जा.क्र./मरापप/जीसीसी/मूल्य/२०१६/ ५३८२
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे -१
दिनांक :२९/०८/२०१६

प्रति,

संस्थाचालक,
सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,
महाराष्ट्र व गोवा राज्य.

विषय :- जी.सी.सी. परीक्षा जून -२०१६
उत्तरपत्रिका छायाप्रती मिळणेबाबत व गुणपडताळणी करणेबाबत.

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, जी.सी.सी. परीक्षा जून - २०१६ चा निकाल दिनांक ३०/०८/२०१६ रोजी परिषदेच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आलेला आहे. जी.सी.सी. परीक्षेबाबत प्रसिध्द केलेल्या अधिसुचनेनुसार विद्यार्थ्यांनी गुणपडताळणी करणेकरिता व उत्तरपत्रिका छायापती प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक १४/०९/२०१६ पर्यंत सोबत जोडण्यात आलेल्या ऑनलाईन अर्ज विहित शुल्कासह (गुणपडताळणीसाठी प्रती विषय रु.१००/- व उत्तरपत्रिका छायाप्रती मिळण्यासाठी प्रती विषय रु.४००/- चलनाने भरावे.) ऑनलाईन अर्ज विहित मुदतीत सादर करावेत. दिनांक १४/०९/२०१६ नंतर प्राप्त होणा-या अर्जाचा व दिलेल्या दरानुसार शुल्क न भरलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. याबाबतच्या सविस्तर सूचना परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत याची नोंद घेण्यात यावी.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१

प्रतः माहितीस्तव व योग्यत्या कार्यवाहीस्तव
१. विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व
२. शिक्षणाधिकारी (माध्य.) सर्व

E/V.J. Chavansir/namuna nikal and press note

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
## जी.सी.सी. परीक्षा जून -२०१६
## उत्तरपत्रिका छायाप्रत मिळण्याबाबतच्या महत्वाच्या अटी/ शर्ती व सूचना

१) विद्यार्थ्याला फक्त त्याच्या स्वत:च्याच उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतीची मागणी परीक्षा परिषदेकडे करता येईल. यासाठी परीक्षा परिषदेकडे विहित पध्दतीने टंकलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

२) ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल १५ दिवसापर्यंत परिषदेकडे विहित नमुन्यात ऑनलाईन अर्ज करता येईल. मुदतीनंतर ऑनलाईल अर्ज भरता येणार नाही. तसेच ऑफलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

३) ऑनलाईन अर्जातील माहीती पूर्णपणे भरलेली असावी. अपुर्ण अर्ज सबमिट ( submit) होणार नाही.

४) उत्तरपत्रिका छायाप्रतीसाठी प्रतिविषय रु. ४००/- इतके शुल्क आकारण्यात येईल. एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही.

५) शुल्क भारतीय स्टेट बँकेच्या (SBI) कोणत्याही शाखेत चलनाने भरावे लागेल. हे चलन टंकलेखन संस्थेस ऑनलाईन उपलब्ध होईल.

६) उत्तरपत्रिका छायाप्रत मिळविण्यासाठी रु. ४००/- इतके शुल्क चलनाने भरुन अर्ज केला असल्यास त्या विषयांच्या उत्तरपत्रिकांची गुणपडताळणी करण्यात येणार असल्याने गुणपडताळणीसाठी स्वतंत्र अर्ज करण्याची आवश्यकता असणार नाही.

७) अर्जदारास छायाप्रत मिळण्याचा कालावधी त्याला भ्रमणध्वनीव्दारे कळविण्यात येईल.

८) मागणी केलेल्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत विद्यार्थ्यांना अर्जात नमूद केल्याप्रमाणे पोस्टाने देण्यात येईल. अर्जावर भ्रमणध्वनी लिहिणे आवश्यक आहे.

९) समक्ष छायाप्रत नेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेशपत्र/ फोटोसह असलेले ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य राहील. यासाठी प्रवेशपत्र अथवा कोणतेही फोटोसह ओळखपत्र मान्य करण्यात येईल.

१०) उत्तरपत्रिका छायाप्रत हस्तपोच घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी तशी पोहोच देणे बंधनकारक राहील.

११) पुनर्मूल्यांकनाची तरतूद नसल्याने पुनर्मूल्यांकन केले जाणार नाही.

१२) परीक्षक/ नियामक इ.ची माहिती, माहिती अधिकाराखाली देण्यात येणार नाही.

१३) परीक्षेत गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची चौकशी झाली असल्याने त्याला माहिती अधिकाराखाली त्याच्या उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार नाही.

१४)संबंधित विद्यार्थ्याने उत्तरपत्रिकांची छायाप्रत अन्य कोणालाही देऊ नये तसेच तिला प्रसिध्दी माध्यमाव्दारे प्रसिध्दी देण्यात येवू नये दिल्यास कारवाईस पात्र राहील.

१५) उत्तरपत्रिकांची छायाप्रत देण्यात येणार असल्याने मूळ उत्तरपत्रिका दाखविली जाणार नाही.

१६) मागणी अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत शुल्क भरले असले तरीही उत्तरपत्रिकेची छायाप्रत देता येणार नाही. तसेच शुल्क ही परत मिळणार नाही.

१७) ऑनलाईन अर्ज सबमिट झाले नसल्यास त्याची जबाबदारी परिषदेवर राहणार नाही. Successful सबमिट झाल्यावर व त्याचे नाव Screen वर दिसल्यास व विहीत चलनाची प्रत दिसल्यास छायाप्रत देता येईल.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१

E/V.J. Chavansir/namuna nikal and press note

# गुणपडताळणीबाबत सूचना

१) गुणपडताळणीसाठी प्रती विषय रु.१००/- (शंभर रुपये) शुल्क आकारण्यात येईल. ( बँक सेवा शुल्क प्रती चलन २०रु. भरावे लागेल.

२) ऑनलाईन निकाल जाहीर झाल्याच्या दिनांकापासून कमाल १५ दिवसापर्यंत परिषदेकडे विहित नमुन्यात संबंधित टंकलेखन/ लघुलेखन संस्थेमार्फत ऑनलाईन अर्ज करता येईल. मुदतीनंतर अर्ज भरता येणार नाही. तसेच ऑफलाईन अर्जाचा विचार केला जाणार नाही.

३) गुणपडताळणीसाठी एकदा भरलेले शुल्क कोणत्याही सबबीवर परत दिले जाणार नाही.

४) गुणपडताळणी अर्ज अपुर्ण भरलेला असल्यास सबमिट ( submit) होणार नाही.

५) गुणपडताळणी नंतर पुनर्मूल्यांकनाची तरतूद नाही.

६) गैरमार्गाचा अवलंब केलेल्या विद्यार्थ्यांची गुणपडताळणी करुन दिली जाणार नाही.

७) मागणी अर्ज सादर करण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत शुल्क भरले असले तरीही उत्तरपत्रिकेची गुणपडताळणी केली जाणार नाही तसेच शुल्कही परत मिळणार नाही.

(सुखदेव डेरे)
आयुक्त,
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ४११ ००१

E/V.J. Chavansir/namuna nikal and press note

# शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा जून - २०१६

## गुणपडताळणी व उत्तरपत्रिका छायांकित प्रत मागणी अर्ज

(Flow Chart)

www.mscepune.in वेबसाईटला भेट देऊन Login करा

⇩

Mark Verification/Xerox Copy Option बटनावर क्लिक करा

⇩

Checkout Result List

⇩

C) Click option Mark Verification if you want for appropriate Candidate.
D) Click option Xerox copy if you want for appropriate Candidate

⇩

Take Challan

⇩

चलनाची प्रिंट घेतल्यानंतर सदर चलन SBI बँकेत भरावी
( Deposit Amount Rs.१२०/- for Mark verification or Rs.४२०/- for Xerox Copy)

⇩

**Upload Challan**
( Extra Challan ie 420/- is applicable for Xerox Copy, If you uploaded before for Mark Verficationverification of the same student)

⇩

Take Prinout of appropriate Candidate

* टीप

१. जर उमेदवाराने गुणपडताळणीसाठी रु.१२०/- (बँक शुल्कासह) चे चलन अगोदर भरले असेल व पुन्हा झेरॉक्स प्रतीची मागणी केल्यास पुन्हा ४२०/- (बँक शुल्कासह) चे चलन भरावे लागेल.

२. अर्जाची प्रत व शुल्क भरलेल्या चलनाची प्रत परिषदेकडे पाठवू नये.

उपरोक्त Flow Chart प्रमाणे कार्यवाही करावी.

E/computer typ.Abh.letter 1Imp